# जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी

संदर्भ :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई गोपनीय पत्र क्रमांक बी.(जन) ५६०१/५७/२०२४/ १८१३ दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४.
२. दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रसिध्द केलेली लघुलेखक श्रेणी-३ या पदाची निवड यादी.

---

## कार्यालयीन आदेश क्र. ( ३६१ )

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भीय पत्र क्र.१ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती नमुद करून जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी मार्फत दिनांक ०३/१०/२०२४ रोजी लघुलेखक श्रेणी-३ पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. लघुलेखक श्रेणी-३ पदाच्या निवड यादीमधील उमेदवारांना नेमणुक देणे बाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी हे खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहेत.

सदरचे आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

| अ. क्र. | निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | कु. शुभांगी शशिकांत एंगडे, लघुलेखक श्रेणी-३ पदाची निवड यादी सन-२०२४ मधील अ.क्र. (०१) वरील उमेदवार. | यांना लघुलेखक श्रेणी-३ या पदावर तात्पुरती नियुक्ती देण्यात येत असुन त्यांची नेमणुक दिवाणी न्यायाधीश क. स्तर, औंढा ना. यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, औंढा ना. यांचे न्यायालयात करण्यात येत आहे. |
| २ * | श्री. रामेश्वर बालाजी केंद्रे, लघुलेखक श्रेणी-३ पदाची निवड यादी सन-२०२४ मधील अ.क्र. (०२) वरील उमेदवार. | यांना लघुलेखक श्रेणी-३ या पदावर तदर्थ स्वरूपात नियुक्ती देण्यात येत असुन त्यांची नेमणुक जिल्हा न्यायाधीश-१, गंगाखेड यांचे आस्थापनेवर सहायक सरकारी वकिल कार्यालय, गंगाखेड यांच्या कार्यालयात करण्यात येत आहे. |

**<u>नेमणुकीच्या अटी व शर्ती :</u>**

०१. उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये लघुलेखक श्रेणी-३ या पदासाठी निवड प्रक्रियेच्या वेळी घेण्यात आलेल्या इंग्रजी व मराठी श्रुतलेखन (Dictation) या चाचणी परीक्षेपैकी राखीव गटातील उमेदवारांना ज्या परीक्षेत ३० टक्के पेक्षा कमी गुण आणि खुल्या गटातील उमेदवारांना ज्या परीक्षेत ३५ टक्के पेक्षा कमी गुण मिळालेले आहेत, ती प्रत्येक चाचणी परीक्षा उमेदवारांनी त्यांच्या नेमणुकीच्या दिनांकापासुन एका वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

०२. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.१ अन्वये उपरोक्त अ.क्र.०२ वरील निवड यादीतील उमेदवाराची लघुलेखक श्रेणी - ३ पदावरील निवड वर नमुद करण्यात आलेल्या अटीस अधीन राहुन तदर्थ स्वरूपात (Ad-hoc basis) करण्यात आलेली आहे.

म्हणून त्यांनी त्यांचे नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांना लागु असलेले बंधपत्र जिल्हा न्यायालय, परभणी येथे सादर करावे व त्यानंतरच त्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी कर्तव्यार्थ रूजू व्हावे.

## बंधपत्र

मी ...................................... बंधपत्र लिहून देतो/देते की, माझी लघुलेखक श्रेणी–३ या पदावर निवड यादीमध्ये अ.क्र............. वर खालील अटीच्या अधिन राहुन निवड झालेली आहे.

१. माझी लघुलेखक श्रेणी–३ या पदावरील नेमणूक ही **तदर्थ (Ad-hoc basis)** स्वरूपाची राहील.

२. लघुलेखक श्रेणी–३ या पदासाठी निवड प्रक्रियेच्या वेळी घेण्यात आलेल्या **मराठी श्रुतलेखन (Dictation)** परीक्षेमध्ये ३५ टक्के (खुल्या प्रवर्गासाठी) / ३० टक्के (राखीव प्रवर्गासाठी) पेक्षा कमी गुण प्राप्त झाले असल्यामुळे संदरची परीक्षा ही माझी उपरोक्त पदावर नियुक्ती झाल्यानंतर ०१ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे माझेवर बंधनकारक राहील.

३. माझी लघुलेखक श्रेणी–३ या पदावर नियुक्ती ही खुल्या/राखीव प्रवर्गातुन झाली असल्यामुळे मला **मराठी श्रुतलेखन** परीक्षेत खुल्या प्रवर्गासाठी ३५ टक्के गुण/राखीव प्रवर्गासाठी ३० टक्के गुण मिळवणे माझेवर बंधनकारक राहील, संदर परीक्षेमध्ये मला ३५/३० टक्केपेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास माझी शासकीय सेवा तात्काळ संपुष्टात येईल याची मला संपूर्ण माहिती आहे.

करिता हे बंधपत्र लिहुन देतो/देते.

दिनांक : / /२०२४ स्वाक्षरी/–

ठिकाण : उमेदवाराचे नाव

निवड यादीतील अ.क्र. व संपूर्ण पत्ता

०३. उपरोक्त दोन्ही उमेदवारांना शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो–१००५/१२६/सेवा–४, दिनांक ३१/१०/२००५ आणि शासन निर्णय क्र. अंनियो–१००७/१८/सेवा–४, दिनांक ०७/०७/२००७ नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागु राहील.

०४. वरील दोन्ही उमेदवारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी एका महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एका महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

०५. नवनियुक्त उमेदवारांनी प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर तात्काळ पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू व्हावेत. जर ते ३० दिवसांत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू झाले नाही तर त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

०६. उपरोक्त उमेदवारांना प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

04/10/2024

(उज्वला म. नंदेश्वर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.

जा.क्र./आस्था/ब–४/10446/२०२४
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी
दिनांक : ०४ ऑक्टोबर, २०२४.

प्रतिलिपी माहिती व योग्य त्याकार्यवाहीस्तव :–

०१– मा. जिल्हा न्यायाधीश–१, गंगाखेड.
०२– मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अंबेजोगाई / परभणी.
०३– मा. दिवाणी / सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, औंढा ना.
०४– प्रबंधक, जिल्हा न्यायालय, परभणी.

०५ – मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे स्वीय सहाय्यक, जिल्हा न्यायालय, परभणी
०६ – अधीक्षक (प्रशासन), जिल्हा न्यायालय, परभणी.
०७ – सहा. अधीक्षक (रोखा व वित्त), जिल्हा न्यायालय, परभणी.
०८ – कु. शुभांगी शशिकांत एंगडे, रा. पार्वती नगर, रविराज पार्क, परभणी, ता.जि. परभणी–४३१ ४०१
(मो.नं. ७३९७८३०१०३)
**मार्फत – मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परभणी.**
०९ – श्री. रामेश्वर बालाजी केंद्रे, रा. लेलघना पोस्ट घाटनांदूर, ता. अंबेजोगाई, जि. बीड–४३१ ५१९.
(मो.नं. ९०७५८१०००४)
**मार्फत – मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अंबेजोगाई.**
१० – संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, परभणी यांना देऊन निर्देशीत करण्यात येते की, सदर कार्यालयीन आदेश जिल्हा न्यायालय परभणीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

5/10/2025

प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, परभणी.